महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १७२५/प्र.क्र.२०६/मातं.(E-1474764)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३१ ऑगस्ट, २०२६

संदर्भ : १) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.२५६/३९, दिनांक ०९.०८.२०१६
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.४७/३९, दिनांक २७.०९.२०२२
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.४७/३९, दिनांक ०३.१०.२०२५
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं -१७१६/प्र.क्र.४७/३९, दिनांक ०१.०१.२०२६
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७२५/प्र.क्र.२०६/३९, दिनांक ३१.०३.२०२६
६) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७२५/प्र.क्र.२०६/३९, दिनांक ०४.०६.२०२६

प्रस्तावना :

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३.४ अन्वये विहित केलेल्या तरतुदीनुसार हे महामंडळ राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे तसेच केंद्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या तसेच संस्था यांचेसाठी माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यित सेवांकरिता मनुष्यबळ पुरवठा करणारी राज्याची एकमेव यंत्रणा आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांच्याकडून माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यीत सेवांकरीता तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्यासाठी सात संस्थांचा पॅनलमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णय हा दि.०१/१०/२०२२ पासून पुढील ३ वर्षाकरिता म्हणजेच दि.३०/०९/२०२५ पर्यंत वैध होता. तथापि, या प्रकरणी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून संस्थांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु असून सदर प्रक्रिया पूर्ण होण्यास काही वेळ अपेक्षित असल्याने सदर शासन निर्णयास संदर्भ क्र. ३ ते ६ येथील शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती. नव्याने संस्थांची निवड करण्याची प्रक्रिया अद्यापही सुरु असल्याने विविध प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांनी नेमलेल्या मनुष्यबळाच्या सेवा खंडीत होऊ नयेत, तसेच विभागांच्या व त्यांच्या अखत्यारीतील क्षेत्रीय कार्यालयांच्या कामकाजात खोळंबा निर्माण होऊ नये, याकरिता संदर्भ

क्र.२ येथील दि. २७/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयास आणखी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उक्त नमूद पार्श्वभूमीवर महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाव्दारे सद्यस्थितीत सुरु असलेली मनुष्यबळ पुरविण्यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन व त्यानुसार नव्याने संस्थांची निवड करुन ऑनबोर्डिंग पूर्ण होईपर्यंत लागणारा वेळ लक्षात घेता संदर्भ क्र. २ येथील दि.२७/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयास आणखी पुढे ३ महिन्यांसाठी म्हणजेच दि. ३०/११/२०२६ रोजीपर्यंत किंवा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून मनुष्यबळ पुरविण्याची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही पूर्ण होऊन शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत, यापैकी, जे अगोदर घडेल, तो पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८३११३०८५७७१११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E82990 7C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AEB4804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965D8, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.08.31 13:09:49 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) प्रबंधक, उच न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई.
१५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०) सर्व पोलीस आयुक्त,
२१) सर्व विभागीय आयुक्त,
२२) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२५) सर्व जिल्हाधिकारी,
२६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित,
२९) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०) निवडनस्ती.